**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे ● अंक ८३ वा ● शनिवार १० ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-


| * Volume 2 | Issue 83 | Date : 10/08/2024 | blow Saturday | Page 4 Price 4

## २१ वर्षीय अमन सेहरावतने पॅरिसमध्ये जिंकलं कुस्तीतील पहिलं पदक

### भारतीय कुस्तीची परंपरा ठेवली कायम

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : भारताच्या २१ वर्षीय अमन सेहरावतने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये ५७ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकावले आहे. अमनने चुरशीच्या लढतीत पोर्तो रिकोच्या कुस्तीपटूचा १३-५ असा पराभव करून कांस्यपदक जिंकले. अशाप्रकारे पॅरिस ऑलिम्पिकच्या १४ व्या दिवशी भारताने सहावे पदक जिंकले आहे. भारताच्या अमन सेहरावतने पहिल्या फेरीत वर्चस्व राखले आणि प्रतिस्पर्ध्यावर ६-३ अशी आघाडी घेतली. यानंतर अमनने दुसऱ्या फेरीतही आपली आघाडी कायम राखली.



अमन आशियाई चॅम्पियन राहिला असून २३ वर्षांखालील जागतिक स्पर्धेतही त्याने सुवर्णपदक पटकावले आहे. भारताला कुस्तीत पदकाची अपेक्षा होती, ती अमनने पूर्ण केली आहे. याआधी सर्वांना विनेश फोगटकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती मात्र अतिरिक्त वजनामुळे तिला साम्यापूर्वीच अपात्र ठरवण्यात आले. अशा परिस्थितीत अमनचे हे पदक कुस्तीत भारतासाठी दिलासादायक बाब ठरले आहे.

सामन्याच्या शेवटच्या दोन मिनिटांत अमनने पोर्तो रिकोच्या कुस्तीपटूवर ८-५ अशी आघाडी घेतली. यादरम्यान क्रुझ डॅरिएन तोई पूर्णपणे दमलेला दिसला. परिस्थिती । पान २ वर

# संसदेचे अधिवेशन अनिश्चित कालावधीसाठी तहकूब

### ओम बिर्लांच्या कार्यक्रमात मोदी, राहुल गांधींसह सर्वपक्षीय नेते उपस्थित!

नवी दिल्ली : संसदेचे पावसाळी अधिवेशन अनिश्चित कालावधीसाठी तहकूब करण्यात आले आहे. वक्फ बोर्ड ठरावादरम्यान वाद झाल्याने लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. परंतु, त्यानंतर, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शुक्रवारी संसदेत चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात सर्वपक्षीय नेते सहभागी झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेत राहुल गांधींनीही या कार्यक्रमात उपस्थिती लावली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना एकाच फ्रेममध्ये दाखवणारे दुर्मिळ दृश्य सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे. पावसाळी अधिवेशन पुढे ढकलल्यानंतर, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासोबत झालेल्या चहापानाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसचे खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा आणि इतर अनेक नेते उपस्थित होते, असे ख-छड ने पोस्ट केले. या बैठकीत कोणत्या विषयावर चर्चा झाली याबाबत अधिकृत माहिती मिळालेली नाही. परंतु, संसदेच्या नियमानुसार अधिवेशन संपल्यानंतर आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमात यंदा सर्वपक्षीय नेते उपस्थित असल्याचं दिसलं.



२२ ऑगस्ट सुरू झालेले संसदेचे पावसाळी अधिवेशन १२ ऑगस्ट रोजी संपणार होते. परंतु, ते आज ९ ऑगस्ट रोजीच तहकूब करण्यात आले. कसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केले. तसंच, राज्यसभेचे कामकाजही तहकूब करण्यात आले.

१८व्या लोकसभेच्या दुसऱ्या सत्राच्या समारोपाचं भाषण देताना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी माहिती दिली की सुमारे ११५ तास चाललेल्या या अधिवेशनात १५ बैठका झाल्या. तर, अधिवेशनादरम्यान सभागृहाची उत्पादकता १३६ टक्के होती, अशी माहिती बिर्ला यांनी एएनआयला दिली.

## पत्रकारांच्या मागण्यांबाबत केंद्र व राज्य सरकारने योग्य ती पावले उचलावेत : शरद पवार

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने शरद पवारांना निवेदन

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

नवी दिल्ली :पत्रकारांच्या विविध मागण्या सरकारला सांगण्यासाठी दिक्षाभूमी नागपूर ते मंत्रालय मुंबई पत्रकार संवाद यात्रा सुरू आहे. केंद्र व राज्य सरकारच्या स्तरावरील असणार्या विविध मागण्या पूर्ण व्हाव्यात यासाठी संवाद यात्रेत मोठ्या संख्येने पत्रकार सहभागी झाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील पत्रकारांच्या मागण्यांबाबत केंद्र व राज्य सरकारने योग्य ती पावले उचलावीत त्यासाठी आपणही प्रयत्न करू अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्यावतीने पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा सध्या सुरू आहे. दि.१७ ऑगस्ट रोजी पत्रकार संवाद यात्रा बारामती येथे पोहोचणार आहे. या पार्श्वभूमीवर संवाद यात्रेला संबोधित करावे यासाठी शुक्रवार दि.९ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथील निवासस्थानी शरद पवार यांची पत्रकार संघाचे पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष नीलकंठ मोहिते, ग्रामीण सरचिटणीस सागर शिंदे यांनी भेट घेतली. यावेळी शरद पवार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणार्यांना डिजिटल सह उत्पन्न करात पाच हजार रक्कमेची सूट द्यावी. असा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्राकडे पाठवावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध होणार्या जाहिरातीवरील पाच टक्के जीएसटी रद्द करावा. राज्य शासनाने ग्रामपंचायतीच्या । पान २ वर

## घरोघरी तिरंगा अभियानाचा ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदान येथून राज्यस्तरीय शुभारंभ

मुंबई : देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लाखो स्वातंत्र्य सैनिकांनी प्राणाचे बलिदान दिले. त्यांच्या त्याग आणि बलिदानाची जाणीव 'घरोघरी तिरंगा अभियान' आपल्याला सतत करून देईल. घरोघरी तिरंगा अभियान राष्ट्रप्रेमाची नवी उभारी देईल, कारण आता हे अभियान लोकचळवळ बनले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सांस्कृतिक कार्य विभाग, मुंबई महानगरपालिका यांच्या वतीने ऑगस्ट क्रांती मैदान येथे आज घरोघरी तिरंगा ( हर घर तिरंगा) अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नगरविकास विकास विभागाचे प्रधान सचिव के. गोविंद राज, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी व अतिरिक्त आयुक्त अमित सैनी, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांची यावेळी उपस्थिती होती.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीत १९४२ रोजी याच ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदान येथून चले जाव चा नारा देण्यात आला. त्यानंतर स्वातंत्र्यासाठीचे हे आंदोलन अधिक व्यापक झाले. लाखो जणांनी आपले प्राण या देशासाठी अर्पण केले. या देशप्रेमाची, शहिदांच्या बलिदानाची आठवण आणि शहीद वीरांप्रती कृतज्ञता म्हणून आपण देशभरात आपल्या राष्ट्रध्वजाविषयी नव्या पिढीत आत्मीयता निर्माण करत आहोत. मागील दोन वर्षात राज्यात घरोघरी तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आले.मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, यावर्षीही राज्यातील अडीच कोटी घरावर तिरंगा फडकवला जाणार आहे. देशप्रेमाची भावना त्याद्वारे जागवली जाणार आहे. विविध दुकाने, आस्थापना यांच्यावरही तिरंगा फडकवला जाणार आहे. आपल्या राष्ट्र ध्वजातील तिरंगा रंग केशरी, पांढरा आणि हिरवा हे रंग त्याग, धैर्य, प्रेम, शांतता आणि विश्र्वासाचे प्रतीक आहेत. नव्या पिढीत हीच प्रेरणा आणि विश्र्वास निर्माण करण्याचे काम हे अभियान करणार । पान २ वर

### हर्षवर्धन पाटील यांची कोंडी कायम

## प्रत्येक पक्षाला सीटिंग सीटिंग जागा मिळतील : अजित पवार

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

इंदापूर/अतुल सोनकांबळेः मी विनाअट भाजपमध्ये प्रवेश केला आहे. यापुढे पक्ष जी काही जबाबदारी माझ्यावर टाकेल, ती मी प्रामाणिकपणाने निभावेल, असं म्हणनारे हर्षवर्धन पाटील सध्या भाजपमध्ये नाराज आसल्याचे उघड झाले असुन दिल्ली दौऱ्यावर जाताना विमानात बसुन हर्षवर्धन पाटील म्हणाले की विमानाचं नात जवळचं आहे. त्यातच आता इंदापूर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यां मध्ये आनंदाचे वातावरण असुन सध्या एक बॅनर वायरल होतोय. आता मागे हटायचं नाही लागा तयारीला याच बॅनर वरती महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व दत्तात्रय भरणे यांचा फोटो असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रत्येक पक्षाला सीटिंग सीटिंग जागा मिळतील असे बॅनर वरती लिहिलेला असून सीटिंग आमदार म्हणून इंदापूर तालुक्याचे विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे यांची उमेदवारी फिक्स झाल्याची बोलले जात आहे तर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे विमान उडणार की हवेत भरकटणार हे पाहणेच आता महत्त्वाचे आहे






## २० ऑगस्टनंतर एकरुख योजनेतुन खरीप हंगामासाठी पाणी सोडले जाणार..!

### प्रशासनाकडून कार्यवाही सुरू; कालव्यातील कचरा काढण्याचे काम सुरु

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः यंदाच्या हंगामात जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरण ओव्हरफ्लो झाले आहे.उजनी धरणातून एकरूख योजनेच्या माध्यमातून कुरनूर धरणात पाणी कधी येणार याकडे संपूर्ण अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.मात्र २० ऑगस्टनंतर हे पाणी मिळणार असल्याचे संबंधित विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत कारंबा पंप हाऊस,हिप्परगा तलाव,बोरामणी पंप हाऊस,दर्गनहळ्ळी पंप हाऊस या सर्व ठिकाणी आवश्यक यंत्रसामुग्रीची तपासणी व चाचणी घेण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.कालव्यात वाढलेले गवत व कचरा काढण्याचे कामदेखील अंतिम टप्प्यात आले आहे.वास्तविक उजनी धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर एकरूख योजनेच्या माध्यमातून कुरनुर धरणात पाणी सोडण्यात येईल अशी अपेक्षा सर्वसामान्यातून व्यक्त केली जात होती.उजनी धरणातुन एकरुख योजनेच्या माध्यमातून खरीप हंगामासाठी आरक्षित पाण्यापैकी ७५ टक्के पाणी सोडता येणार आहे.संभाव्य पुरपरिस्थिती व पावसाच्या गणितावर पाणी सोडले जाणार आहे.८२२ दशलक्ष घनफूट पाणीसाठा क्षमता असलेल्या कुरनूर धरणात शुक्रवारपर्यंत २६ टक्के म्हणजेच २१३.७२ दशलक्ष घनफूट पाणीसाठा झाला आहे.दमदार पावसाअभावी कुरनुर धरणात समाधानकारक पाणीसाठा नसल्याने सर्वांचेच लक्ष एकरुख योजनेतुन मिळणाऱ्या उजनीच्या पाण्याकडे लागले आहे.दरम्यान एकरुख योजनेतुन कुरनुर धरणापर्यंत पाणी सुरळीतपणे जावे यासाठी अधिकारी व कर्मचारी लक्ष ठेवून आहेत.





**लवकर पाणी सोडणे गरजेचे : सिध्दाराम म्हेत्रे (माजी मंत्री)**

पाऊस लांबल्याने अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील पिके अडचणीत आली आहेत. ही वस्तुस्थिती डोळ्यासमोर ठेवून जिल्हाधिकारी महोदय यांना उजनीचे ओव्हरक्लो पाणी कुरनुर धरणात सोडण्यासंदर्भात निवेदन दिले होते. हे पाणी आताच्या घडीला मिळणे खूप गरजेचे आहे.सद्यस्थितीत हे पाणी मिळाल्यास खरीप हंगामातील पाणी सोडण्यासाठी अडचणीतील शेतकऱ्यांना मदत होऊ शकते.

### येत्या दोन दिवसांत बैठक व निर्णय..

एकरुख उपसा सिंचन योजना व इतर योजनेतुन जिल्ह्यातील विविध ठिकाणी पाणी साठविण्यासंदर्भात येत्या दोन दिवसांत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद,संबंधित विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक होणार आहे.यानंतर पाणी सोडण्याची प्रक्रिया होईल.बैठकीत सकारात्मक निर्णय झाल्यास २० ऑगस्टपुर्वीदेखील एकरुख उपसा सिंचन योजनेतुन कुरनुर धरणात पाणी सोडले जाऊ शकते,अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातुन मिळाली.

# संपादकीय

## लक्षात घ्यायला हवे...

निवडणुका असोत किंवा नसोत सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना व्यासपीठ मिळाले की टाळ्यांचे वाक्य फेकण्याचा मोह होतो. महाराष्ट्राने यापूर्वी असे अनेक वक्ते देशाला दिले आहेत. पण सध्या महाराष्ट्राच्या राजकारणाच्या पटलावर जी काही डायलॉगबाजी सुरू आहे ती पाहता व्यासपीठ गाजवण्याच्या हेतूपेक्षाही ज्याच्यावर टीका करत आहात त्याला दुखावण्याचा हेतूच जास्त दिसत आहे. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये मुळातच महाराष्ट्राच्या राजकारणाने वेगळे वळण घेतले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या दोन महत्त्वाच्या पक्षांमध्ये फूट पडली. त्यानंतर विखारी संवादाच्या माध्यमातून त्या त्या पक्षांची मते बाहेर येत आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी फेकलेले डायलॉग पाहता सर्वांनाच 'तोल मोल के बोल' हा सल्ला देण्याची गरज वाटू लागली आहे. खरेतर सामाजिक जीवनात वावरणाऱ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नेहमीच तोलून मापून बोलणे आणि वागणे अपेक्षित असते. कारण त्यांच्या बोलण्याचा आणि वागण्याचा कोणता अर्थ घेतला जाईल याची कोणतीच खात्री देता येत नाही. विशेषतः आधुनिक कालावधीमध्ये सोशल मीडिया प्रचंड प्रमाणात सक्रिय असताना राजकीय पक्षांच्या नेत्यांना सावधगिरीने आपला संवाद साधावा लागतो. पण जेव्हा या संवादाचे रूपांतर डायलॉगमध्ये होते तेव्हा मात्र सर्व मर्यादा उलटून जातात आणि केवळ प्रतिपक्षाच्या नेत्यांना मानसिकरीत्या जखमी करणे हा एकच हेतू बाकी राहतो. माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी गेल्या आठवड्यामध्ये विद्यमान उपमुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून केलेली एकेरी टीका असो किंवा एखादा इशारा असो किंवा त्यानंतर पुणे येथे झालेल्या जाहीर सभेमध्ये केलेली जहरी टीका असो यामधून फक्त समोरच्या नेत्यांना दुखावण्याचाच हेतू समोर येत आहे. एकेकाळी महाराष्ट्राचे राजकारण सर्वात सुसंस्कृत राजकारण आहे अशा प्रकारचा उल्लेख देशपातळीवर केला जात असे. पण आज देशातील इतर कोणतेही राज्य आदर्श राजकारण करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख करतील असे वाटत नाही. महाराष्ट्रातील सर्वच प्रमुख नेत्यांनी आपल्या या विखारी डायलॉगबाजीला वेळीच आवर घातला नाही तर बिहार या राज्याचा जसा गुंडगिरी प्रतीत करण्यासाठी विशेषण म्हणून वापर केला जातो तसाच एक नकारात्मक विशेषण म्हणून देशाच्या राजकारणामध्ये महाराष्ट्राच्या नावाचा वापर सुरू होईल हे सर्वांनीच लक्षात घ्यायला हवे.

पान १ वरुन

## पत्रकारांच्या मागण्यांबाबत केंद्र व राज्य

वार्षिक आराखड्यात वृत्तपत्र खरेदीसाठी दहा हजार रकमेची तरतूद करावी. बाळशास्त्री जांभेकर निवृत्ती योजनेतील जाचक अटी रद्द कराव्यात. अधिस्वीकृती पत्रिका ग्रामीण भागातील पत्रकारांना मिळावी. यासाठी प्रक्रिया सुलभ करावी यातील वेतन पावतीची अट रद्द करावी. यासह विविध २६ मागण्यांचे लेखी निवेदन शरद पवार यांना देण्यात आले. राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आणि राज्य संघटक संजय भोकरे, सरचिटणीस विश्वास आरोटे, कार्याध्यक्ष प्रविण सपकाळे, प्रदेश उपाध्यक्ष नितीन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या संवाद यात्रेची माहिती शरद पवार यांना जिल्हाध्यक्ष नीलकंठ मोहिते यांनी दिली. तसेच खासदार सुप्रिया सुळे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी पवार यांनी पत्रकारांच्या मागण्यांबाबत केंद्र व राज्य सरकारने तात्काळ पावले उचलावीत यासाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.

## २१ वर्षीय अमन सेहरावतने

अशी बनली की त्याला ब्रेक घ्यावा लागला. शेवटची एक मिनिट बाकी असताना अमनने १२-५ अशी आघाडी मिळवली होती. वेळ संपताच अमनने १३ गुणांसह सामना जिंकला. अशा प्रकारे भारताला १४व्या दिवशी सहावे पदक मिळाले आहे.अमन सेहरावतच्या पदकाने ऑलिम्पिकमध्ये भारताच्या कुस्तीची शान कायम ठेवली आहे. २००८ पासून भारताने सलग ५ ऑलिम्पिकमध्ये कुस्तीमध्ये पदके जिंकली आहेत. हॉकीनंतर भारताची सर्वाधिक ८ ऑलिम्पिक पदकं कुस्तीतून आली आहेत. ऑलिम्पिकच्या इतिहासात प्रथमच, १९५२ मध्ये, केडी जाधवने भारतासाठी कुस्तीमध्ये कांस्यपदक जिंकले. यानंतर ५६ वर्षे भारताला कुस्तीमध्ये पदक मिळाले नाही आणि त्यानंतर सुशील कुमारने २००८ बीजिंग ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून हा दुष्काळ संपवला. तेव्हापासून भारतीय कुस्तीपटू ऑलिम्पिकमध्ये सातत्याने पदके जिंकत आहेत.रवी कुमार दहियाने ५७ किलो वजनी गटात गेल्या ऑलिम्पिकमध्ये भारतासाठी रौप्य पदक जिंकले होते. अमनने राष्ट्रीय निवड चाचणीत रवीचा पराभव करून ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवली होती. तत्पूर्वी, अमन सेहरावतने उपांत्यपूर्व फेरीत अल्बेनियाच्या झेलीमखान अबाकारोवावर तांत्रिक श्रेष्ठतेच्या (१२-०) जोरावर उपांत्य फेरी गाठून पदकाची आशा दिली होती.

# मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम: रोजगार निर्मिती आणि शासकीय योजनांचा प्रसार

युवांना रोजगार पुरविणे हे मुख्य उद्दिष्ट समोर ठेऊन राज्य शासनामार्फत अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये नुकत्याच सादर झालेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात 'मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजने'ची घोषणा करण्यात आलेली होती. त्याअंतर्गतच राज्यात ५० हजार 'मुख्यमंत्री योजनादूत' नेमण्यात येतील असेही घोषित करण्यात आले होते. त्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला असून या योजनेमुळे राज्यातील युवांना रोजगार मिळण्यासह शासकीय योजनांचा तळागाळापर्यंत प्रसार होऊन पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाने हाती घेतलेल्या विविध योजना, उपक्रम, ध्येय धोरणे आदींची माहिती थेट ग्रामीण भागापर्यंत योजनादूतांच्या माध्यमातून पोहोचणार आहे. अंदाजे ३०० कोटी रुपये खर्च या कार्यक्रमासाठी येणार आहे.कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयावर असून योजनादूतांना कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाकडून मानधन देण्यात येणार आहे.

प्रशासकीय यंत्रणा गतिमान होण्यास मदत

राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला सहाय्य करण्याकरीता 'मुख्यमंत्री योजनादूत' नेमले जाणार आहेत. राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याकारी योजनांची प्रचार, प्रसिद्धी करुन त्यांचा अधिकाधिक नागरिकापर्यंत लाभ पोहचविण्याकरीता 'मुख्यमंत्री योजनादूत' थेट गावपातळीपर्यंत नेमण्यात येणार आहे.ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ व शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येणार आहे. त्यांना प्रत्येकी १० हजार रुपये प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येणार आहे. निवड झालेल्या योजनादूतासोबत ६ महिन्यांचा करार केला जाणार आहे. सदरचा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

योजनादूत निवडीकरीता पात्रतेचे निकष: उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा. तो कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा. त्याला संगणकाचे ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत भ्रमणध्वनी असावा. तो महाराष्ट्राचा अधिवासी असावा. त्याच्याकडे आधार कार्ड, त्याच्या नावाचे आधार संलग्न बँक खाते असावे. आवश्यक कागदपत्रे:– विहित नमुन्यातील 'मुख्यमंत्री योजनादूत' कार्यक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधारकार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे, प्रमाणपत्र असावी. सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र, वैयक्तिक बँक खात्याचा तपशिल, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील हमीपत्र जोडणे आवश्यक आहे.

नेमणूक प्रक्रियाः उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या बाह्यसंस्थांमार्फत पूर्ण करण्यात येणार आहे. ऑनलाईनरीत्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी प्रत्येक जिल्हा माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार आहे. जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या शैक्षणिक व वयोमर्यादिविषयक मूळ कागदपत्रांची तपासणी करणार आहेत. त्यानंतर प्रत्येक उमेदवाराबरोबर ६ महिन्याचा करार केला जाईल.

जिल्हा माहिती अधिकारी शासकीय योजनांच्या माहिती संदर्भात पात्र उमेदवारांचे समुपदेशन व निर्देशन करतील. जिल्ह्यात ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक आणि शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी एक या प्रमाणात उमेदवारांना योजनादूत म्हणून योजनांचा प्रसार व प्रसिद्धीकरिता पाठविण्यात येईल. उमेदवारांना सोपविण्यात आलेले कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. या नेमणूकीच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही.

योजनादूताने करावयाची कामे:–योजनादूतांनी जिल्ह्यातील योजनांची माहिती घेऊन नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जात ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करतांना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील.

योजनादूत सोपविलेल्या जबाबदारीचा स्वतःच्या स्वार्थासाठी किंवा नियमबाह्य कामासाठी उपयोग, गुन्हेगारी स्वरुपाचे गैरवर्तन आदी करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येईल, तसेच त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल. अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही. **संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# पत्रकारांच्या वेदनांचा हुंकार!

दुरचित्रवाहिणीचे जळगाव येथील पत्रकार किशोर पाटील यांनी पत्रकाराचं जगणं काव्यरूपात मांडले तेव्हा पत्रकार परिषदेत उपस्थित शंभरपेक्षा अधिक पत्रकारांच्या डोळ्यात पाणी तरळले. तर धुळ्यात ज्येष्ठ संपादकांनी कोरोनानंतर वृत्तपत्रांच्या खपाची परिस्थिती बदलली तरी सरकारच्या जुन्याच नियमांमुळे स्थानिक संपादकांची कशी प्रशासकीय पातळीवर लुट चालू आहे याचे भयान वास्तव मांडले. अमरावतीत काहींनी, पत्रकार जेव्हा आजारी पडतो, अपघातात मृत्यूमुखी पडतो तेव्हा त्याची कुटुंबाची आणि त्याची किती बिकट अवस्था होते हे सांगताना प्रामाणिकपणे काम करून पदरी काय तर उपेक्षा आणि पश्चात्ताप हे समोर आणलं. वृध्दत्व, आजारपण, अपघात झाल्यानंतर ज्या माध्यम संस्थेत काम करतो ते ही मदत करत नाही आणि सरकारने तर वार्यावर सोडून दिलेले असल्याने अपेक्षेने पहावे कुणाकडे? असे प्रश्न उपस्थित केले. महानगरात काम करणार्या नामवंत पत्रकारांनाही जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील पत्रकारांचे काहीच सोयर सुतक नाही. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेचे चौथा स्तंभ म्हणून मानल्या जाणार्या क्षेत्रातील सामान्य पत्रकारांच्या वेदनांचा हुंकार संवाद यात्रेतून जागोजागी बाहेर पडतो आहे. आणि याच हुंकारातून पत्रकारांच्या एकीचे आणि पत्रकारांकडे असलेल्या मतांच्या शक्तीचे दर्शन सरकारला घडविण्याचा निश्चय ठिकठिकाणचे पत्रकार करू लागले आहेत.

भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच समाजाचे प्रश्न मांडणार्या स्थानिक माध्यमांच्या मागण्यांसाठी दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा २८ जुलैला सुरूवात झाली. मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे व माजीअध्यक्ष चंदन शिरवाळे यांनी हिरवा झेंडा दाखवला. सरचिटणीस विश्वास आरोटे आणि कार्याध्यक्ष यात्रा संयोजक प्रविण सपकाळे यांच्या नियोजनात पहिल्याच दिवशी विविध पन्नास सामाजिक संघटनांनी पत्रकारांच्या न्याय मागण्यांना पाठींबा देवून सरकारने मागण्या मंजूर कराव्यात असे आवाहन केले.




लोकशाही व्यवस्थेत पत्रकार प्रमुख घटक असला तरी या घटकाची अवस्था काय? कोरोनानंतर वृत्तपत्रांचा खप कमी झाला. अनेक वृत्तपत्रांनी आवृत्त्या बंद केल्या. स्थानिक पातळीवरील वृत्तपत्रांना मिळणार्या जाहिराती कमी झाल्याने आणि वाढलेले कागदाचे दर आणि विक्री किंमत यामुळे वर्तमानपत्र चालवणे कठीण झाले आहे. परिणामी दहा-वीस वर्षे काम केलेल्या पत्रकारांना नोकरी गमवावी लागली आहे. तर काम करत असणार्यांना अत्यंत कमी पगारात काम करण्याची वेळ आली आहे. ग्रामीण भागातील वार्ताहरांना तर आता मानधन मिळणेही जवळपास बंद झाले आहे. वृत्तवाहिण्यात काम करणार्या पत्रकारांना पुर्वी स्टोरीवर मानधन मिळत असे आता बातम्यांचा कोटा देवून त्यांना कोणत्याही सुविधा न देता राबवले जाते. हे वास्तव जागोजागी पत्रकारांनी मांडले. वृत्तपत्रांचा उत्पादन खर्च आणि विक्री किंमत यातील तफावत जाहिरातीमधून भरून निघणे अवघड झाले आहे. कोरोनानंतर बहुतांशी व्यवस्थापने सोशल मिडीयातून जाहिरात करत आहेत तर सरकारनेही वर्तमानपत्रांना दिल्या जाणार्या जाहिराती कमी केल्या आहेत. वर्तमानपत्राची विक्री किंमत ठरविण्याचे धोरण काय आहे? प्रत्येक उत्पादनाची किमत (एमआरपी) ठरविण्याचे धोरणे आहेत. मग वर्तमानपत्राचे काय? असेही प्रश्न समोर आले. मध्यंतरी मोठ्या वृत्तसमुहाने स्थानिक आवृत्या काढून स्वस्तात देण्याची स्पर्धा सुरू केली. परिणामी जिल्हा, तालुका, गावपातळीवरील वर्तमानपत्रे आणि पत्रकार यामुळे अडचणीत आले. परिणामी व्यावसायीक पातळीवर वर्तमानपत्रे परवडत नसल्यामुळे अनेक वर्तमानपत्रांनी प्रकाशने केली आहेत. त्यामुळे पत्रकारांसह या व्यवसायातील इतर कर्मचार्यांवर बेकारीची कुर्हाड कोसळली आहे. सर्वच माध्यमातील पत्रकार विविध समस्यांनी आणि प्रश्नांनी त्रस्त झाले आहेत. मात्र समाजाचे प्रश्न मांडणार्या या पत्रकारांना आपल्या समस्या मांडण्यासाठी मात्र आपल्याच माध्यमात जागा नाही. प्रामाणिकपणे काम करणार्या पत्रकाराला सुरूवातीला आमिष दाखवून जवळ घेतले जाते अन्यथा माध्यम समुहच विकत घेवून खरे लिहिणार्या पत्रकाराला बाजूला केले जाते. तर अनेकठिकाणी वैयक्तीक, कौटूंबिक पातळीवर अडचणीत आणले जाते. पत्रकार संरक्षण कायदा मंजूर झाला असला तरी त्याची स्थानिक पातळीवर अमलबजावणी होत नाही हे वास्तव अनेकठिकाणी पत्रकारांनी मांडले. उलट पत्रकारांवरच थेट खंडणीचे गुन्हे दाखल करण्यात आले. बातमी छापली किंवा प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप असेल तर न्यायालयात दाद मागितली पाहिजे पण अलीकडे थेट फौजदारी गुन्हे दाखल करून पत्रकारांचा छळ केला जात आहे आणि काही ठराविक वर्ग जाणिवपूर्वक काही घटनांना समोर करून संपूर्ण माध्यम क्षेत्रालाच बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. माध्यमातील वरिष्ठही वस्तुस्थिती न पाहता उपदेशाचे डोस पाजून मोकळे होतात हे वास्तव स्थानिक पातळीवरील पत्रकारांनी आपल्या व्यथांमधून मांडले. कोणत्याही व्यवस्थेला प्रश्न विचारणारे, खरे बोलणारे नको असतात, बरे बोलणारे, स्तुती करणारे गोड लागतात. अलीकडे तर सर्वच राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांनी पत्रकारितेतीलच अनेकांना नोकरीला ठेवून पीआर निर्माण केला आहे. त्यामुळे त्यांना सर्वच माध्यम आणि पत्रकार आपल्याबरोबर आहेत असा भास होतो. परिणामी राज्यकर्ते आणि राजकारण्यांनी एकतर्फी संवाद सुरू करून प्रतिवाद आणि सर्वंकष संवादाची पध्दतच कमी केली आहे. पत्रकार समाजातील प्रमुख घटक आहे आणि देशभरात ३५ हजार कोटीपेक्षा मोठा व्यवसाय असल्याने यावर लाखो लोकांचे रोजगार आता अवलंबून आहे. हे लक्षात घेवून सरकारने या क्षेत्रालाही आर्थिक पातळीवर सक्षम करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे आणि स्थानिक पातळीवरील पत्रकारांना न्याय देण्याची भूमिका घेतली तरच लोकशाहीत सामान्य माणसाचा आवाज बुलंद राहिल असाच विचार यात्रेत बहुतांशी ठिकाणी समोर आला आहे. मतपेटीचा विचार करूनच सरकार कोणत्याही घटकाला न्याय देण्याची मानसिकता ठेवत असेल तर प्रत्येक पत्रकार मतांचा गठ्ठा आहे हे आता पत्रकार सांगु लागले आहेत. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान वीस पत्रकार सक्रिय आहेत. प्रत्येक पत्रकाराच्या मोबाईलमध्ये दोन हजारापेक्षा अधिक नंबर असल्याने पत्रकारांचा गावातील सामान्य माणसापासून प्रमुखपर्यंतचा संपर्क असतो. प्रत्येक पत्रकाराने वैयक्तीक पातळीवर पाचशे मतदारांना जागृत केले तरी महाराष्ट्राच्या २८८ मतदारसंघातील तीस लाखापेक्षा अधिक मतावर पत्रकारांचा सहजपणे प्रभाव पडतो, या मतदावाची जाणिव पत्रकारांना होवू लागली आहे. लोकशाहीत मतांच्या आकड्यांवरच सरकार बनत असेल आणि बनलेले सरकार न्याय देण्यासाठीही मतांचाच विचार करत असेल तर पत्रकारांनीही जागृत होवून विचार करावा अशा भावनाही समोर आल्या. नागपूरपासून सुरू झालेल्या यात्रेला जागोजागी पत्रकारांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवत स्वागत केले. एकीच्या शक्तीचे बळ किती असते? याचा प्रत्यय जिल्हा, तालुका, शहर पातळीवर पत्रकार एकजुटीने नारा देत आहेत. पत्रकार म्हणजे छोटा पॅकेट बडा धमाका हे वास्तव स्थानिक पातळीवरून समोर येवू लागले आहे. नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, शेगाव, जळगाव, धुळे ते शिर्डी प्रवासात गावपातळीवरील पत्रकारांनी विविध सामाजिक संघटना, राजकीय कार्यकर्ते यांना सहभागी करून पत्रकार यात्रेच्या पहिल्याच टप्पात लोकसंवादात परिवर्तन केले. सामान्य नागरिकांनीही उत्सुकता निर्माण झाल्याचे जागोजागी दिसून आले. चोवीस जिल्ह्याच्या ठिकाणी आणि पावणे दोनशे तालुक्यातून जवळपास चार हजार किलोमीटरचा प्रवास करत संवाद यात्रा मंगळवार दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी मुंबईत मंत्रालयावर पोहोचेल तेव्हा राज्यभर पत्रकारांच्या समस्यांचा जागर झालेला असेल. सामान्य पत्रकारांना आपल्याकडे असलेल्या मतांच्या शक्तीची जाणिव होईल आणि ही यात्रा माध्यमक्षेत्राला अधिक सक्षम आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी यशस्वी होईल.

– वसंत मुंडे, प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

## घरोघरी तिरंगा अभियानाचा ऐतिहासिक

आहे. अधिक उत्साहात आणि जल्लोषात हे अभियान साजरे करून राज्यभरात देशभक्तीचा मळा फुलणार आहे आणि देशप्रेमाचा सुगंध वाहणार आहे.या अभियानात गावागावात, शहरात रॅली, पदयात्रा, तिरंगा सेल्फी, स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार अशा माध्यमातून हे अभियान साजरे करायचे आहे. सर्वांच्या सहकार्यातून हे अभियान यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यात विकास आणि कल्याणकारी योजनाच्या माध्यमातून नागरिकांची सेवा करण्याचे काम राज्य शासन करत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमूद केले.आपल्या खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत विविध पदक मिळवून तिरंगा फडकवला, याचा अभिमान आपल्या सर्वांना आहे. आपल्या राज्याच्या स्वप्नील कुसाळे यांच्यासह नीरज चोप्रा, मनू भाकर, हॉकी संघाने पदक पटकावले. ही खरोखरच अभिमानाची आणि आनंदाची बाब असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी नमूद केले.प्रास्ताविकात अपर मुख्य सचिव श्री. खारगे म्हणाले की, देशभरात घरोघरी तिरंगा अभियान राबविले जात आहे. राज्यातही मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात हे अभियान साजरे केले जात आहे. या अभियानात मागील दोन वर्षा प्रमाणेच आपले राज्य आघाडीवर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि इतर मान्यवरांनी हुतात्मा स्मृती स्तंभास अभिवादन केले. कार्यक्रमानंतर पदयात्रा आणि सायक्लाथॉन यात्रेस यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. यानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तिरंगा कॅनव्हास वर स्वाक्षरी केली आणि त्याठिकाणी असलेल्या घरोघरी तिरंगा अभियानाच्या सेल्फी पॉईंटवर सेल्फीही घेतली. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी उपस्थितांना तिरंगा प्रतिज्ञा दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# काँग्रेस पक्षाकडे आदित्य फत्तेपूरकर यांनी केली विधानसभेच्या उमेदवारीची मागणी

## काँग्रेसकडून पंढरपूर विधानसभा लढवण्यास फत्तेपुरकर इच्छुक

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात काँग्रेसकडे आदित्य फत्तेपुरकर यांनी उमेदवारीची मागणी केली आहे. पंढरपूर आणि मंगळवेढा मतदारसंघ काँग्रेस पक्षाकडून अधिकृत निवडणूक लढवण्यासाठी फत्तेपूरकर यांनी पक्षाकडे मागणी केली आहे.



पंढरपुरातील काँग्रेसचे निष्ठावंत घराणे म्हणून फत्तेपुरकर यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या ३० वर्षापासून फत्तेपुरकर हे पंढरपूरच्या राजकारणात सक्रिय आहेत. तालुका युवक काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष म्हणून आदित्य फत्तेपूरकर यांनी काम पाहिले. तर पंढरपूर नगर परिषदेचे दोन वेळा नगरसेवक पद ही भूषवले. पुण्यश्र्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्य पदी देखील फत्तेपूरकर यांनी काम पाहिले आहे. याशिवाय पक्षात देखील सक्रियपणा कायम असल्याने त्यांनी उमेदवारीची मागणी केली. सुशील कुमार शिंदे यांचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून आदित्य फत्तेपुरकर यांची जिल्ह्यात ओळख आहे. याशिवाय धनगर समाजाचे नेते म्हणून आदित्य फत्तेपुरकर यांच्याकडे पाहिले जाते..

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसचे उमेदवार नूतन खासदार प्रणितीताई शिंदे यांना सोलापूर लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक मताधिक्य पंढरपूर आणि मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात मिळाले. त्यामुळे पंढरपूरची जागा काँग्रेसच्या माध्यमातून लढवली जावी अशी काँग्रेस कार्यकर्त्यांची इच्छा आहे. यामध्येच पंढरपुरात काँग्रेसची प्रचार यंत्रणा सक्षमपणे राबवणारे आदित्य फत्तेपूरकर यांनी आता उमेदवारीची मागणी केली आहे. सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष नंदकुमार पवार यांच्याकडे फत्तेपुरकर यांनी निवडणूक उमेदवारी मागणीचा अर्ज दिला. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अशोकराव देवकते , माजी सरचिटणीस राजेंद्र मोरे , संतोष शिरगिरे उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यात माजी केंद्रीय गृहमंत्री तथा माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनात कायमच काँग्रेसची वाटचाल राहिली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत देखील काँग्रेस सर्वाधिक जागांवर निवडणूक लढवून काँग्रेस उमेदवारांचा विजय निश्र्चित करेल. असा विश्र्वास याप्रसंगी आदित्य फत्तेपुरकर यांनी व्यक्त केला .

# उगाव हायस्कूलने पाठवल्या सीमेवरील जवानांना ७०५ राख्या



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधीः भारत देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र कडा पहारा देणाऱ्या भारतीय सीमेवरील सर्व जिगरबाज जवानांना येणाऱ्या रक्षाबंधन सणानिमित्त तालुक्यातील उगाव येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ५वी ते १२वी च्या मुला-मुलींनी ७०५ राख्या पाठवून जवानांबद्दलचे भाऊ-बहिणीचे अनोखे प्रेम जोपासले आहे, राख्या बनविण्यासाठी शिक्षिका रुकसाना पठाण यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.याप्रसंगी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात डॉ सीमा डेर्ले, मालती वाघावकर,सिंधुताई धारराव,प्राचार्य कैलास गवळी, भालचंद्र सूर्यवंशी आदींनी मनोगते व्यक्त केली.

सदर उपक्रम निफाड येथील राजमाता जिजाऊ महिला मंचच्या संकल्पनेने व उगाव हायस्कूलच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला असून यावेळी शाळेच्या मुला - मुलींनी सीमेवरील जवानांना पत्र पाठवून त्यात आम्हा सर्वांचे आयुष्यही या धाडसी,शूर व जिगरबाज जवानांना लाभो तसेच सैनिकांबद्दल अतिशय चांगल्या स्वरूपाचे गुणगान गायले असून अश्या स्वरूपाची मनोमन प्रार्थना देखील विद्यार्थांनी देवाकडे यावेळी केली आहे, याप्रसंगी राजमाता जिजाऊ महिला मंचच्या अध्यक्षा डॉ सौ सीमा डेर्ले,उपाध्यक्षा सिंधुताई धारराव,संघटक मालती वाघावकर, पर्यवेक्षक नंदराम ढिकले आदींसह विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भालचंद्र सूर्यवंशी यांनी तर आभार बापू आव्हाड यांनी मानले.

राजमाता जिजाऊ मंच तर्फे सैनिकांना राख्या पाठवणे हा उपक्रम २०१५ पासून सुरु आहे.यंदा आम्ही शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना यात जोडून घेत आहोत. याद्वारे विद्यार्थांमध्ये सैनिकांप्रती असलेली कृतज्ञता, आत्मीयता प्रकट होऊन राखीच्या एका धाग्याने या विद्यार्थ्यांचे आपल्या शूर सैनिकांशी अतूट असे नाते जोडले जावे. तसेच सैनिकांमध्ये असलेले शौर्य व शिस्त याबद्दल आदरभाव व देशप्रेम निर्माण होऊन सुजाण नागरिक घडावेत.

**-डॉ. सीमा डेर्ले, अध्यक्ष-**
**राजमाता जिजाऊ महिला मंच,निफाड**

# भिवंडी रोड रेल्वे स्थानकानातून नियमित रेल्वे सेवा सुरू करण्याची खा.बाळ्या मामा यांची केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे मागणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव :यंत्रमाग व कामगार नगरी असलेल्या भिवंडी शहरात गोदाम पट्टा मोठया प्रमाणात फोफावल्याने या ठिकाणी कामगार वर्ग भिवंडी शहरासह ठाणे मुंबईहून भिवंडीत येत असतो तसेच भिवंडीतील चाकरमानी नोकरी व प्रवासासाठी भिवंडीतून ठाणे मुंबईत जात असतात.मात्र भिवंडी रोड रेल्वे स्थानकातून केवळ दिवा वसई या मार्गावर मर्यादीत रेल्वे फेऱ्या असल्याने प्रवाशांना रस्त्यावरील वाहनांमधून प्रवास करावा लागतो.सध्या रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी होत असून रस्त्याचा प्रवास खर्चिक असल्याने अनेक कामगारांना गाडी भाड्याचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.त्यामुळे येथील प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी भिवंडी रोड रेल्वे स्थानकातून नियमित व जादा लोकल फेऱ्या सुरु करून या मार्गाचे सर्व्हेक्षण करून इलेक्ट्रिक मल्टीपल युनिट सेवा सुरू करावी अशी मागणी भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्र्विनी वैष्णव यांच्याकडे

लेखी निवेदनाद्वारे केली आहे. कल्याण मुरबाड रेल्वे मार्गाच्या जमीन अधिग्रहनासाठी अतिरिक्त निधी द्यावा- कल्याण मुरबाड रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने २०२३ मध्ये जमीन अधिग्रहणासाठी २०० कोटी रुपये मंजूर केले आहेत, मात्र प्रत्यक्षात ही जमीन अधिग्रहण करण्यासाठी १५०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक असून

लवकरात लवकर हि अतिरिक्त निधी उपलब्ध करावी अशी मागणी देखील खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी रेल्वेमंत्री अश्र्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

# हस्तकला मधील प्रामाणिकपणे काम करणार्या कारागिरांच्या मागण्या पूर्ण करा अन्यथा कोल्हापुरी स्टाईलने उत्तर देऊ : डॉ.युवराज मोरे

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



टाकळीवाडी/प्रतिनिधीः आज जागतिक पातळीवर हस्त कलेचे महत्त्व अग्रगण्य स्थानावर आहे.त्यातील कलाकुसर ही अप्रतिम असते.यामध्ये चामडी चप्पल, मातीच्या वस्तू ,हस्त शिलाई वरील काम,दगडी कलाकुसर, लाकडी काम असे अनेक उद्योग हस्त कलेमध्ये येतात आणि यासाठी केंद्रशासनाणे एक स्वतंत्र हस्त कला विभाग स्थापन करून यातील कारागिरांची नोंदणी करून सर्वांना या उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते व त्याचा भत्ताही दिला जातो.येवढेच नव्हे तर या व्यवसायासाठी संपूर्ण देशात स्टॉल दिले जातात.ज्यामुळे या कारागिरांना व्यवसायासाठी व्यासपीठ उपलब्ध होते आणि आर्थिक पाठबळ मिळते.पण या हस्तकला विभागाच्या कारभाराने प्रामाणिक कारागिरांची नोंदणी केली जात नाही आणि त्यांना दुर्लक्षित केले जात असल्याची माहिती पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ युवराज मोरे यांच्या निदर्शनास आली.यावेळी सर्व कारागिरांना सोबत घेऊन जिल्हा उद्योग भवन येथील हस्तकला विभागाचे आयुक्त चंद्रशेखर सिंग यांची भेट घेतली आणि त्यांना कारागिरांच्या वर होत असलेल्या अन्यायाबाबत पाढाच वाचला.तसेच राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित लोकांची यादी कार्यालयात का नाही असा जाब विचारला.चुकीच्या कारागिरांची नोंदणी करून प्रामाणिक कारागिरांना का वंचित ठेवले आहे असा प्रश्र्न उपस्थित केला.हातावर पोट असणाऱ्या कारागिरांना न्याय दिला नाही तर कोल्हापुरी स्टाईलने उत्तर देऊ असा सज्जड इशारा डॉ युवराज मोरे यांनी आयुक्त चंद्रशेखर सिंग यांना दिला.यावेळी करवीर पंचायत समितीचे माजी सभापती राजेंद्र सुर्यवंशी यांनी कारागिरांच्या मागण्या तात्काळ मार्गी लावा अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. यावेळी पत्रकार नियाज जमादार,अमर बाजीराव सातपुते (राष्ट्रपती पुरस्कार सन्मानित),अश्र्विनी अमर सातपुते,अरविंद जोतिराम सातपुते,सतिश सातपुते,संभाजी साठे,विजय सातपुते,लता सातपुते ,अस्मिता सातपुते,छाया जाधव,मंगल जाधव ,सुनिता जाधव कारागीर उपस्थित होते.

# रिपाइं प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवस निमित्त १६ ते २६ तारख्यापर्येंत विविध उपक्रम राबविणार : अविनाश मडीखांबे

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



अक्कलकोट/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने पदाधिकारी व कार्येकर्ते यांच्या बैठक सपन्न झाले सदर बैठेकीत लोकनेते राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवस निमित्त अक्कलकोट तालुक्यात ग्रामीण व अक्कलकोट मैदर्गी व दुधनी या भागात शाळेत शालेय साहित्य वाटप करणे क्रीडा स्पर्धा , वृक्षारोपण , सर्व रोग निधान शिबीर ,खाऊ वाटप , ग्रामीण रुग्णालयात फळे वाटप व गरजुना जेवण व गाव तेथे शाखा फलक असे अनेक उपक्रमे राबविण्यात येणार असल्याचे बैठेकीत निर्णय घेण्यात आला व तसेच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात बूथ बांधणी व जुना व नवीन शाखा निर्माण करणे व रिपाई आपल्या दारी लवकरात घेण्यात येणार आहे असे मत रिपाई ता अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी केले,यावेळी कर्यक्रमाच्या अध्यक्ष तात्यसाहेब काळे ( युवक जिल्हा अध्यक्ष सोलापुर) उपस्थित होते. सदर बैठेकीत सैदप्पा झळकी जिल्हा उपाध्यक्ष , सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरू ( युवक जिल्हा सरचिटणीस ) अप्पा भालेराव (युवक ता अध्यक्ष) ,अजय मुकणार (शहर अध्यक्ष) , राजु भगळे ( ता सरचिटणीस ), तम्मा धसाडे ( युवका ता सरचिटणीस), रवी सलगरे, दत्ता कांबळे, मेहदीमिया जीडगे, प्रकाश गडगडे, सचिन बनसोडे, निगपा नींबाळ व आदिनी आपल्या मनोगत व्यक्त केले यावेळी रिपाई जेष्ठ नेते अंबादास गायकवाड ,चंद्रकांत गायकवाड,विलास गायकवाड, गोरखनाथ धोडमनी ,बाबुराव निरगुडे (सरपंच बबलाद) रमेश धोडमनी ( सरपंच अंदेवाडी) राजाभाई बोरगाव, उमेश शिवशरण,अंबादास शिंगे,अनिल धसाडे , राजू गवळी,कृष्णा धोडमनी,सुरेश गायकवाड,दस्तगीर मुजावर,पांडुरंग गायकवाड,भिमा गायकवाड,वालचंद सोनकांबळे,किसन जाधव,अनिल बाळशंकर,व आदी उपस्थित होते

# स्वेरीच्या २१ विद्यार्थ्यांची 'भारत फोर्ज लिमिटेड' या कंपनीत निवड

**दैनिक यशसिद्धी न्यूज**





पंढरपूर/प्रतिनिधी : 'भारत फोर्ज लिमिटेड' या भारतीय बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या २१ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

भारत फोर्ज लिमिटेड' या भारतीय बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून शरयू शेखर गरड, भाग्यश्री ऋषिकेश पाटील, आशुतोष दर्लिंग माने, शिल्पा भाऊ भुसनर, स्नेहल संजय कोरे, सागर उमेश पाटील, प्रमोद नागनाथ कोरके, प्रज्ञा संजय माने, अमित अभिमन्यू जाधव, रोहन नवनाथ सुरवसे, पल्लवी दत्तात्रय कोकरे, पल्लवी सुरेश बचुटे, श्रेया काशिनाथ शिंदोळ, पवन राजेंद्र शिंदे, शिवप्रसाद पांडुरंग कारंडे, तुषार मोहन मेटकरी, सौरभ धनाजी घाडगे, जगन्नाथ परशुराम आवताडे, आदित्य कांतीलाल नकाते, आसावरी भिमराव चव्हाण व प्रगती सुरेश साळुंखे या २१ विद्यार्थ्यांची निवड केली. या कंपनीची स्थापना १९६१ साली झाली असून बाबा कल्याणी हे या पूर्ण ग्रुपचे चेअरमन आहेत. ही कंपनी फोर्जिंग, मेटल्स, ॲटोमोटिव्ह, डिफेन्स, एनर्जी या क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. या कंपनीत सध्या ५ हजारापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधून प्लेसमेंटच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत. स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. 'स्वेरी' मधून विविध कंपन्यात प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे सध्याच्या आकडेवारीवरून दिसून येते. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, विविध सॉफ्टवेअर्स, मॉक इंटरव्युव्ह यांचे प्रशिक्षण दिले जाते. स्वेरीमध्ये वार्षिक परीक्षांचे उत्कृष्ट निकाल, संशोधने, मानांकने, इन्फ्रास्ट्रक्चर याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून करिअरच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या प्लेसमेंटकडे देखील अधिक लक्ष दिले जाते व मोठमोठ्या कंपन्यांना हवे तसे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी घडविण्यासाठी प्रशिक्षित तज्ञांकडून उत्कृष्ट मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट व संबंधित विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# इंदापूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी पारंपरिक खेळात सहभागी होऊन लुटला आनंद

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

इंदापूर/अतुल सोनकांबळेः इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय कनिष्ठ विभागाच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, संस्थेचे संचालक युवानेते राजवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे आणि उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे यांच्या प्रेरणेने क्रीडा व सांस्कृतिक विभागाने नागपंचमी निमित्ताने क्रीडांगणावर आयोजित केलेल्या पारंपारिक खेळामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आनंद लुटला.नागपंचमी सणानिमित्त महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या कला व वाणिज्य विभागामधील मुलांनी व मुलींनी उत्साहामध्ये आट्या-पट्या ( सूर पट्ट्या) कबड्डी, खो-खो , व्हॉलीबॉल ,मुलींचे पारंपारिक खेळ यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपला आनंद द्विगुणित केला. क्रीडा विभाग प्रमुख प्रा.बापू घोगरे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. रोहिदास भांगे तसेच सहकारी प्राध्यापक यांनी उत्कृष्ट नियोजन करीत सहभागी खेळाडूंना प्रोत्साहन दिले.



# पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे यांचा सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरव

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहर वासियांना प्रांताधिकारी सचिन इथापे तहसीलदार सचिन लंगोटे यांची कौतुक आषाढी वारी एकादशी यात्रा व वारकरी पालखी सोहळ्याचे वारीत केले होते नेटके नियोजन कौतुक आपल्या कार्याचे वर कार्यक्रमात पंढरपूर महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सन्मानित पंढरपूर येथील आषाढी एकादशी सोहळा निमित्त पंढरपुरात विठुर रायच्या दर्शनासाठी येणारे वारकरी व पालखी सोहळ्याचे नियोजन उत्कृष्ट अशा पद्धतीने यशस्वीरित्या केल्याबद्दल पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे व तहसीलदार सचिन लंगोटे यांना उत्कृष्ट कार्याबद्दल प्रशासनाने कौतुक आपल्या कार्याचे व कार्यक्रमास सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करून गौरविण्यात आले

जावळे कार्यक्रमास व्यासपीठावर पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे इत्यादी प्रमुख मान्यवर उपस्थित होते पंढरपूर येथील सन २०२४ आषाढी यात्रा सर्व अधिकारी वर्गासाठी प्रथमच आषाढी यात्रा यशस्वीरित्या संपन्न करण्याचा प्रसंग आला जिल्हास्तरीय अधिकाऱ्यापासून ते तालुकास्तरीय प्रांताधिकारी तहसीलदार नवखे असूनही आषाढी यात्रा यांनी पहिल्यांदाच पार पडली पूर्वीपेक्षा या आषाढी यात्रे वारीमध्ये अंदाजे २४ लाख वारकरी २२ विठोबांच्या दर्शनासाठी असल्याचा अंदाज आहे सदर आषाढी यात्रा अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने पार पडले याबाबत सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी जिल्हा प्रशासनाचे कौतुक केले होते. आषाढी एकादशी सोहळा वारीमध्ये ६५ एकरासारखी धरतीवर प्रांत अधिकारी व सचिन इथापे व तहसीलदार सचिन लंगोटे यांनी जिल्हाधिकारी कुंभार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर येथे आषाढी एकादशी यात्रा सोहळा होण्याअगोदर सर्व विभागातील अधिकाऱ्यांची पंढरपुरात वारकरी भावी भक्तांची गर्दी होऊ नये याकरिता नियोजनबाबतीत चर्चा करण्यात आली होती त्याप्रमाणे वारकरी भाविकांना इतरत्र मुक्काम करण्यासाठी आणखी तळ गोपाळपूर भटुंबरे वाखरी या ठिकाणी वारकरी भाविक भक्तांना निवासाची सोय करण्यात आली त्यामुळे ६५ एकरावरील मुक्काम ठिकाणी प्रत्येक वर्षी यात्रा दरम्यान दिवशी असणारी भाविकांची गर्दी कमी होऊन ती इतर ठिकाणी गेल्याने भाविकांना सुख सुविधा देण्याचे उत्कृष्ट नियोजन चांगल्या प्रकारे करण्यात आले त्यामुळे आषाढी एकादशी यात्रा सोहळा सुरळीत पार पडला होता एकादशी दिवशी पंढरपुरात अंदाजे २४ लाख २२ पंढरपूर रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले होते त्यामुळे आषाढी वारी सुखरूप झाल्याची चर्चा वारकऱ्यांमधून होत होती तसेच आरोग्य बाबत जिल्हा प्रशासनाचे व तालुका प्रशासनाने विविध ठिकाणी मेडिकल कॅम्प आयोजन केलेले होते




पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आषाढी यात्रा यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहन देण्यासाठी प्रशासनाने कौतुक आपल्या कार्याचे हा उत्साहित कार्यक्रम घेऊन पंढरपूरचे प्रांत अधिकारी सचिन इथापे पंढरपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके तहसीलदार सचिन लंगोटे नायब तहसीलदार पंडित कोळी काशिगावचे मंडल अधिकारी बाळासाहेब मोरे मंडल अधिकारी दिनेश भंडगे मंडलाधिकारी राजाभाऊ वाघमारे मंडळ अधिकारी विजय शिवशरण तलाठी प्रमोद खंडागळे समाधान शिंदे अमर पाटील प्रशांत शिंदे मुसा काजी यांना प्रशासित पत्र देऊन गौरवण्यात आले

सदर कार्यक्रमाच्या इतरही पोलीस विभाग आरोग्य विभाग पंचायत समिती विभाग जिल्हा परिषद विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागातील अधिकाऱ्यांचा प्रशिक्षित पत्र देऊन सन्मानित करण्यात आले

# श्री विठ्ठल रुक्मिणीमातेस भाविकाकडून १ लक्ष रुपयाची देणगी; व्यवस्थापक मनोज श्रोत्री

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर येथील भाविक आशा वामन कुलकर्णी यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीस १ लक्ष रुपयाची देणगी धनादेश स्वरूपात दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने आशा कुलकर्णी यांचा सत्कार मंदिर समितीचे विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. या देणगीदाराने आपल्या आई-वडिलांच्या म्हणजेच कै. श्री व सौ सरस्वती विनायक पिंपरकर यांच्या स्मरणार्थ देणगी दिली आहे. यावेळी देणगीदार कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. देणगी देणाऱ्या इच्छुक भाविकांनी मंदिर समिती कार्यालयात संपर्क करावा. देणगीसाठी क्यू आर कोड,



धनादेश, रोख स्वरूपात, आरटीजीएस, मोबाईल प, संकेतस्थळ इत्यादी माध्यमातून सोय उपलब्ध आहे. याशिवाय, अन्नछत्र सहभाग योजना व महानैवेद्य सहभाग योजना देखील उपलब्ध असल्याचे विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे यांनी सांगितले.

# पंढरपुरातील पूरग्रस्तांना मिळणार आर्थिक मदत

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः उजनी धरणातून भिमा नदी पात्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने पंढरपूर शहरातील काही भागात पूरस्थिती निर्माण झालेली होती यामुळे भिमा (चंद्रभागा) नदी काठच्या सखल भागातील काही घरांमध्ये पुराचे पाणी आले होते यामुळे या भागातील अनेक कुटूंबियांना या भागातून प्रशासनाने दुसरीकडे स्थलांतरीत केले. आता भिमा (चंद्रभागा) नदीला आलेला पूर ओसरला आहे व नदीची पाणी पातळी देखील कमी झालेली आहे. या पुराने बाधित झालेल्या नागरिकांच्या घरांचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून पूर बाधित असणाऱ्या कुटूंबियांना त्वरित आर्थिक मदत करावी अशी मागणी जनसेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत माने यांनी पंढरपूरचे तहसिलदार यांना निवेदनाद्वारे केल्यानंतर त्याची दखल घेण्यात आलेली आहे.पंढरपूरचे नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी विजयकुमार जाधव यांनी सर्व मंडळ अधिकारी यांना आदेश दिला असून पुराने बाधित झालेल्या भिमा नदी काठच्या नागरिकांच्या घरांचे पंचनामे करून अहवाल तहसिल कार्यालयास सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे भिमा (चंद्रभागा) नदी काठच्या भागातील नागरिकातून जनसेवा प्रतिष्ठानचे आभार मानले जात आहेत.यावेळी निवेदन देताना महादेव अहिरे, प्रकाश जाडकर, स्वप्निल गोंजारी, संजय खराडे, रामा करंडे, कल्याण लेंडवे आदि उपस्थित होते.

# खा.धैर्यशिल मोहिते पाटील यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घेतली भेट

अकलूज/प्रतिनिधीःनवी दिल्ली येथे माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन विविध विकास कामांची केली मागणी.



माढा लोकसभा मतदारसंघातील गोयेगाव ता.करमाळा जि.सोलापूर ते आगोती ता.इंदापूर जि.पुणे, दरम्यान उजनी जलाशयात पूल बांधणेबाबत. तसेच सातारा - लातूर महामार्गावरील कुर्डूवाडी जंक्शन रेल्वे लाईनजवळ गेट क्र. ३८ येथे रोड ओव्हर ब्रिजचे निर्माण करणे. याचबरोबर टेंभुर्णी ते पंढरपूर छक ५६१- च्या सहा पदरी महामार्गाची करावा म्हणून मागणी केली.यावेळेस खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मागणीला केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी खा.सुप्रिया सुळे खा.भास्कर भगरे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# पर्यावरणाच संवर्धन करण्यासाठी वृक्षारोपण ना चालना दिल पाहिजे : तहसीलदार विनायक मगर

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/ गौतम बाळशंकर : पर्यावरणाच्या संवर्धन करण्यासाठी वृक्षारोपण काळाची गरज आहे. वृक्षारोपण केल्यावर उद्याचं भविष्य उज्वल आहे. अन्यथा आपल्याला ग्लोबल वार्मिंग च्या प्रश्र्नाला सामोरे जावं लागणार आहे. यासाठी वृक्षारोपणाला अधिक विचारणा देणे काळाची गरज आहे. असे प्रतिपादन अक्कलकोट तहसीलदार विनायक मगर यांनी. हन्नूर येथील २५१ वृक्षारोपण सोहळयाच्या निमित्ताने बोलत होते. नवीन बारा ज्योतिर्लिंग महादेव मंदिर येथील. श्रावण निमित्त ग्रामपंचायत च्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून. गटविकास अधिकारी शंकर कवितके कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी



ज्येष्ठ नेते मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामपंचायत सदस्य गौतम बाळशंकर यांनी केली. यावेळी सरपंच सोनाली तळवार उपसरपंच सागर दादा कल्याण शेट्टी, ग्रामपंचायत सदस्य जयश्री भरमशेट्टी, शैलेश पाटील ग्रामविकास अधिकारी सी एल थोरात, माजी उपसरपंच शरणापा हेगडे, तंटामुक्त अध्यक्ष सिद्राम पुजारी, ज्येष्ठ नागरिक शिवाप्पा भरमशेट्टी, अनिल तलवार, अंगणवाडी सेविका ज्योती बाळशंकर, नयाबाई बाळशंकर,आदी यावेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन. ग्रामपंचायत सदस्य गौतम बाळशंकर यांनी केले तर आभार ग्रामविकास अधिकारी सी एल थोरात यांनी केली.

# तेलुगु नाभिक समाजाचा चिमटेश्वर रथोत्सव उत्साहात

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : दरवर्षीप्रमाणे यंदाही नागपंचमी निमित्त तेलुगु नाभिक समाजाचे कुलदैवत भगवान श्री चिमटेश्र्वर महाराज यांचा रथोत्सव शुक्रवारी मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा करण्यात आला.

नागपंचमी रोजी या समाजातर्फे चिमटेश्र्वर यांचा रथोत्सव काढण्याची प्रथा आहे. शुक्रवारी पहाटे साडेपाच वाजता साईबाबा चौक येथील तेलुगु नाभिक ज्ञाती संस्थेच्या चिमटेश्र्वर मंदिरामध्ये मानकरी संजीव कोंडूर परिवाराच्यावतीने गणपती पूजा, अन्नपूर्णादेवी पूजा, महारुद्र अभिषेक, होमहवन करण्यात आला. राजू तमनूर, राजू सामल यांच्या वतीने महापूजा विधी पार पाडली. सतीश बोला यांच्या पौरोहित्याखाली पूजा विधी पार पडली.

मंदिरात विविध पूजा विधी पार पडल्यानंतर चिमटेश्र्वर यांची उत्सवमूर्ती कन्ना चौक परिसरातील हनुमान मंदिराजवळ आणण्यात आली. त्यानंतर विविध फुलांनी सजवलेल्या रथामध्ये ही मूर्ती ठेवण्यात आली. त्यानंतर सवाद्य मिरवणुकीला सुरुवात झाली.



मिरवणुकीत विविध कलाप्रकार सादर करणारी मंडळे सहभागी झाली होती.

नाभिक युवक संघटना, फ्रेंड्स डान्स ग्रुप आर्या टू डान्स ग्रुप यामध्ये समावेश होता.मिरवणुकीत तेलुगु नाभिक समाजाचे अध्यक्ष अनिल कोंडूर,

युवक अध्यक्ष भास्कर तमनूर, उत्सव समिती अध्यक्ष पुंडलिक पुंडलिक रासमल, आनंद सिंगराल, अभयकुमार कांती, दशरथ बल्लोजी, प्रसाद सुरमपल्ली, वेणू सुरमपल्ली, विठ्ठल सिंगराल, यल्लय्या नडीगोटू, सत्यनारायण सिंगराल, राजू कडिंगुल, शेखर कोंडापुरे संजय कोंडूर, राजू जांपाल, बालराज सोमल, रामुलू कोंडूर, सदानंद कोत्तीगट्टू, सिद्राम श्रावणपल्ली, मोहन जमदाडे, ओमप्रकाश सुरमपल्ली यांच्यासह मराठी भाषिक नाभिक बांधव देखील सहभागी झाले होते.

कन्ना चौक येथून मिरवणुकीची सुरुवात झाल्यावर पूर्व भागातील प्रमुख चौकांमधून त्याची परिक्रमा होत ही मिरवणूक साईबाबा चौकातील चिमटेश्र्वर मंदिराजवळ विसर्जित झाली. त्यानंतर भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.

# भिमाई आश्रमशाळेत विद्यार्थ्यांनी लुटला पतंग उडविण्याचा व झोके खेळण्याचा आनंद..

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

इंदापूर/प्रतिनिधीः : विद्यार्थ्यांना रुढी परंपरा व संस्कृतीची माहिती व्हावी या हेतूने श्रावण मासातील नागपंचमी या सणाचे औचित्य साधत विद्यार्थ्यांनी स्वतः पतंग तयार करुन ते उडविण्याचा व झाडाला बांधलेले झोके खेळण्याचा आनंद घ्यावा, याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात वरील उपक्रमाचे आयोजन केल्याची माहिती प्राचार्या अनिता साळवे यांनी दिली.मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलाच्या आवारात संकुलातील बच्चे कंपनीने स्वतः बनविलेले पतंग उडविण्याचा व झाडाला बांधलेले झोके खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला.

श्रावण महिन्यातील पहिला सण म्हणून नागपंचमीला विशेष महत्व आहे. ग्रामीण भागासह शहरात देखील नागपंचमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी अनेक ठिकाणी झोके बांधले जातात.नागपंचमी दिवशी मुली व महिलांनी झोके खेळण्याची परंपरा आहे.झोके खेळल्यामुळे बच्चे कंपनीचा उत्तम व्यायाम झाला. त्यांना आरोग्याचे अनेक फायदे मिळाले. पतंग उडविण्यात व झोका खेळण्यात शैक्षणिक संकुलातील बच्चे कंपनी दंग होऊन गेल्याचे चित्र दिसून आले. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद द्विगुणित झाल्याचे जाणवत होते. बच्चे कंपनीला पतंग उडविण्याची व झोके खेळण्याची संधी प्राचार्या अनिता साळवे यांनी उपलब्ध करून दिल्याने विद्यार्थ्यांनी त्यांचे मनापासून आभार मानले.



# डुबेरे जनता विद्यालयात मध्ये क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन साजरा

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते. व्यासपीठावर दिगंबर जाधव,सोमनाथ पगार,पी.आर.करपे,अरुण डावरे,रेखा खंडीझोड, कचेश्र्वर शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात रामदास वाजे म्हणाले , क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.क्रांतीकारकांनी ब्रिटिश सत्तेच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची परवा न करता आहुती दिली. अशा अमर




हुतात्म्यांची आठवण नव्या पिढीला राहावी यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिन साजरा केला जातो.स्वातंत्र्य चळवळीतील हा ऐतिहासिक दिवस आपण भारतीय कधीही विसरू शकणार नाही. तसेच आदिवासी दिन का साजरा केला जातो तसेच शासन आदिवासी बांधवांसाठी राबवित असलेल्या विविध योजनांची त्यांनी माहिती दिली.

तसेच नागपंचमी या धार्मिक सणाविषयी उपशिक्षिका भारती निखाडे यांनी सखोल माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी तर आभार सुनिल ससाणे यांनी मानले.यावेळी डी. ए. रबडे,शिवनाथ हुजरे ,राजेंद्र गांगुर्डे, मारुती डगळे, रामदास वारुंगसे,रेवन कांगणे, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे,रोहिणी भगत आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.